**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १२५/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री चंदनदास गणपत मेश्राम<br>मु. पेंढरी पो. हरदोली<br>ता लाखांदूर जि. भंडारा | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी<br>एकात्मीक बाल विकास सेवा योजना, लाखांदूर<br>ता. लाखांदूर जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>एकात्मीक बाल विकास सेवा योजना, लाखांदूर<br>ता. लाखांदूर जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २५/०४/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १८/०१/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१४/०३/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २५/०४/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (सांख्यिकी) एकात्मिक बालविकास सेवा योजना लाखांदूर श्री सि. एल. तादुरवार उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी श्री पी. डी. कडवे हे उपस्थित आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि.०६/०८/२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्य कार्यपालन अधिकारी भंडारा कार्यालय यांचेकडे अर्ज करुन थकीत व नियमीत प्रवासभत्ता आणि प्रसुतीचा कालावधी रजेचे मानधन इ. बाबत १ एप्रिल २००७ ते २००९ या कालावधीतील १ ते ८ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी जिल्हा मुख्य कार्यपालन अधिकारी, भंडारा यांचेकडे दि.०४/०८/२००८ ला दिलेल्या पत्रावर संबंधित अधिकाऱ्यांकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे त्याची प्रत, स्थगित मानधन व इतर मानधन न मिळण्याचे कायदेशिर कार्यवाही बाबत घेतलेल्या भूमिकेच्या स्पष्टीकरणाच्या प्रती, कार्यकर्तीच्या नावाने व्हाऊचर तयार करणे व मदतनीसच्या नावाने खात्यावर पैसे जमा करणे या संबंधात माहिती पुरविणे, तसेच कर्मचारी हजेरी रजिस्टर व व्हिजीट पुस्तिका शिंदेबाई व निखारे यांनी प्रकल्प अधिकारी यांच्या टेबलवरुन गहाळ केले त्याची माहिती अशी एकूण ८ मुद्यांवर माहिती मागितली होती. परंतू जनमाहिती अधिकारी यांनी सदर अर्जाची कोणतीही दखल घेतली नाही व माहिती दिली नाही. त्यामुळे प्रथम अपील दाखल केले. परंतू प्रथम अपीलानंतरही अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीचेवेळी सांगितले.

४. आज आयोगापुढे सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (सांख्यिकी) एकात्मिक बाल विकास सेवा योजना लाखांदूर श्री तादुरवार हे उपस्थित आहेत तसेच तात्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी कु. बोदेले ह्या उपस्थित आहेत. तसेच विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी श्री कडवे हे देखील हजर आहेत. जनमाहिती अधिकारी आणि विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.०६/०८/२००९ चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला नाही. मात्र उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) जिल्हा परिषद भंडारा यांचेकडून दि. ०७/११/२००९ च्या पत्रान्वये दि. ०६/०८/२००९ चा अर्ज आणि प्रथम अपीलाचा दि. ०५/१०/२००९ चा अर्ज हे दोनही अर्ज एकत्रीतरित्या दि.०७/११/२००९ रोजी प्राप्त झाले परंतू अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचा स्पष्टपणे बोध होत नसल्याच्या कारणास्तव अपीलकर्त्यास दि.१३/११/२००९ च्या पत्राने त्यांच्या कार्यालयात दि.१६/११/२००९ रोजी सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. त्याला अनुसरुन अपीलार्थी जनमाहिती अधिकारी आणि बाल विकास प्रकल्प अधिकारी लाखांदूर यांचे कार्यालयात हजर झाले होते. आणि त्याचदिवशी अपीलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात आणि केलेल्या कार्यवाहीच्या बाबत सुनावणी घेण्यात आली. त्यामध्ये तीन मुद्ये घेण्यात आले आणि त्या तीन मुद्यांवर कार्यवाही करुन अपीलार्थीस केलेल्या कार्यवाहीची माहिती कळविण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला. आणि

त्याला अनुसरुन बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी अपीलार्थीच्या तीनही मुद्यांवर केलेल्या कार्यवाहीची माहिती दि.१९/१२/२००९ च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिली असे तात्कालीन बालविकास अधिकारी आणि विद्यमान बालविकास अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. त्यावर अपीलार्थी यांनी सदरचे दि.१९/१२/२००९ चे पत्र त्यांना प्राप्त झाल्याचे आयोगापुढे मान्य केले. परंतू सदर पत्रात नमूद केलेले पेमेंट त्यांच्या बँकेच्या खात्यात अद्यापही जमा झालेला नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. म्हणून प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी अपीलार्थीच्या खात्यावर जमा केलेल्या पेमेंटबाबत प्रत्यक्ष जातीने लक्ष देवून त्यांच्या खात्यात पेमेंट जमा झाले अगर कसे याची खात्री करुन घेणे आवश्यक आहे म्हणून जनमाहिती अधिकारी आणि विद्यमान बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयामार्फत अपीलार्थीच्या खात्यात जमा केलेल्या पेमेंटबाबत प्रत्यक्ष जातीने लक्ष देवून बँकेकडे याबाबत खात्री करुन तसेच बँकेच्या अधिकाऱ्यांकडे संपर्क साधून त्यावर लवकरात लवकर कार्यवाही करणे संयुक्तिक राहील म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून विद्यमान जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा विद्यमान बालविकास प्रकल्प अधिकारी आणि तत्कालीन बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आत श्रीमती कौशल्या चंदनदास मेश्राम यांच्या बँकेच्या खात्यात त्यांचे थकीत पेमेंट जमा करण्यात आले अगर कसे याबाबत बँकेच्या अधिकाऱ्यांकडे संपर्क साधून खात्री करुन घेऊन अपीलार्थीस तसे विनामुल्य रजिस्टर पोस्टाने किंवा व्यक्तीशः कळवावे.

P.T.O.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**